SUPPLEMENT

TO THE

# BOMBAY GOVERNMENT GAZETTE.

Published by Authority.

FRIDAY, 28TH MARCH 1862.

## PROCEEDINGS OF THE LEGISLATIVE DEPARTMENT, BOMBAY.

THE following Extract from the Proceedings of His Excellency the Governor of Bombay in Council assembled for the purpose of making Laws and Regulations, is hereby published for the information of all whom it may concern :—

*Wednesday, 26th March* 1862.

The Council of the Governor of Bombay for the purpose of making Laws and Regulations met according to adjournment.

*PRESENT*:—

The Honorable Mr. Frere,
The Honorable Mr. Inverarity,
The Honorable Mr. Westropp,
The Honorable Mr. Tristram,
The Honorable Mr. Rustomjee Jamsetjee Jejeebhoy,
The Honorable Mr. Juggonath Sunkersett,
The Honorable Mr. Premabhai Hemabhai,
The Honorable Mr. Scott,
The Honorable Mr. Robertson,
And the Deputy Secretary.

Mr. Frere, being the Senior Ordinary Member of Council present, presided in the absence of the Governor.

The President said that the first subject before the Council was the Report of the Select Committee on "a Bill for the Restoration of the Grassias in the Ahmedabad Collectorate and for their relief from debt," the consideration of which had been postponed at the last Meeting

Mr. WESTROPP said it would be found that the Committee had considerably enlarged the Bill, but substantially it was based on the original one prepared by Mr. Reeves. He thought it desirable to have the average annual profit mentioned in the 1st Section more clearly defined.

Mr. ROBERTSON said that 70 per cent. was now taken by the Government, leaving only 30 per cent. to the Talookdar.

Mr. WESTROPP proposed the following amendments in the 1st Section:—

That the words "annual profit" in the 9th line be omitted, and the words "rents, profits, and other annual income" be inserted in lieu thereof; and that after the word "years" in the 11th line the following words be inserted: "after deducting thereout the Land Tax and other dues of Government."—*Carried unanimously.*

Mr. PREMABHAI HEMABHAI moved as an amendment that the word "ten" be substituted for the word "five" in the 8th line.

*The amendment was negatived by 6 to 3.*

Mr. WESTROPP proposed that the word "Publication" be substituted for the word "making" in the first lines of the 2nd, 3rd, and 5th Sections.—*Carried.*

Mr. PREMABHAI HEMABHAI wished to know whether the words "Landed Estates" in the 7th lines of the 3rd Section included Wanta.

Mr. WESTROPP said they certainly did.

Mr. WESTROPP proposed that after the word "Talookdar" in the 7th line of the 3rd Section, the following be inserted: "of any description of tenure."—*Carried.*

Mr. WESTROPP proposed that the word "Mortgager" in the 8th line of the 3rd Section be changed to "Mortgagee," and that after the word "or" in the same line the word "other" be inserted.—*Carried.*

Mr. WESTROPP proposed that after the word "arrest" in the 5th and 6th lines of the 4th Section, the following be inserted: "nor shall his personal Estate of any description whatsoever be liable to seizure, attachment, or sale."—*Carried.*

Mr. WESTROPP proposed that between the words "process" and "of" in the 6th line, the following be inserted: "decree, judgment, or execution."—*Carried.*

Mr. WESTROPP proposed that the word "publication" be substituted for the word "making" in the 18th line of the 7th Section.—*Carried.*

Mr. PREMABHAI HEMABHAI proposed that the word "sixth" be substituted for the word "three" in the 11th line of the 8th Section.

Mr. WESTROPP objected to the proposed amendment, and said that the Committee were of opinion that three months were quite enough.

Mr. JUGGONATH SUNKERSETT was in favour of six months because a man might not be at the place, or he might have gone on a pilgrimage.

Mr. ROBERTSON said those cases were provided for by the 9th Section, and that six months would protract the officer's labours very considerably.

Mr. JUGGONATH SUNKERSETT withdrew his objection.

The amendment was put and negatived by 8 to 1.

Mr. WESTROPP proposed to omit the words "disencumberment of each Talookdaree Estate" in the 5th and 6th lines of the 10th Section, and to substitute "settlement of the Talookdar's debts and liabilities."—*Carried.*

Mr. PREMABHAI HEMABHAI proposed to add the words "nor decrease" after the word "increase" in the 11th line of the same Section.

The amendment was put and negatived by 8 to 1.

Mr. WESTROPP said that the 11th Section was adopted on the suggestion of the gentleman who had made such an able report on these matters (Mr. Peile), and he (Mr. Westropp) was certainly in favour of the section being retained, though in an altered form. He therefore proposed to substitute for the 11th Section the following one:—

"XI. It shall be lawful for the Governor in Council to empower the Officer or Officers aforesaid to raise a Fund to be applied to the settlement of the debts and liabilities of the Talookdar, by assigning the whole or a portion of his landed Estates of any description of tenure to be held and enjoyed for a period or periods not exceeding 20 years from the publication of the declaration aforesaid by any fit person or persons who may advance money on the security thereof, or by the sale of such outlying portion or portions of the said Estates as may appear expedient, but in case of such sale the consent of the Talookdar and of his next heir, if the latter be of age, shall first be obtained."—*Carried.*

Sections 12, 13, 14, 15, 16, and 17 were then agreed to.

Mr. Westropp proposed to omit the words "Magistrates by Act II. of 1839" in Section 18, and substitute the following: "Courts by Section 61, Act XXV. of 1861."—*Carried.*

Sections 19, 20, and 21 were then agreed to.

Mr. Westropp proposed to insert after the word "shall" in the 6th line of the 7th Section the following words: "defray thereout the land tax and other debts due or liabilities incurred or hereafter respectively to grow due or be incurred to the Crown or Government and."—*Carried.*

The President said that under the 29th Rule the motion for the second reading could not be made.

Mr. Westropp proposed, as the Bill had been fully discussed and was now agreed to, that the President should suspend the 29th Rule.

The President suspended the 29th Rule.

Mr. Tristram moved that the Bill as amended be read a second time.

The Bill as amended was then read a second time by the Deputy Secretary and passed.

The President said the next subject for consideration was the Report of the Select Committee on a Bill regarding Juvenile Reformatories.

The President moved the following amendments of which he had given notice at the last meeting:—

"That instead of the words 'such Institution' in the 4th and 5th lines of Section I. of the Bill, the following be substituted: 'School in which Industrial training is provided, and in which children are clothed, lodged, and fed, as well as taught.'" —*Agreed to.*

"That the word 'he' be substituted for 'it' in the 26th line of Section III. of the Bill."—*Agreed to.*

"That the words 'be liable to' in the 6th line of Section VI. of the Bill be omitted, and that the following Section be added as Section XI."—*Agreed to.*

XI. "The word Parent in this Act shall include any person legally liable to maintain a child."—*Agreed to.*

Mr. Premabhai Hemabhai considered the provisions of the Bill to be too rigorous, and proposed the following amendments:—

"That the following words be inserted between the words 'direct' and 'such' in the 11th line of Section III.: 'If such Court, Judge, or Police Magistrate shall think fit.'"—*Negatived.*

"That the word 'one' be substituted for 'two' in the 16th line of the 3rd Section and the word 'four' for 'five' in the 17th line of the same Section.—*Negatived.*

"That the words 'six months' be substituted for 'three years' in the 15th line of the 4th Section."—*Negatived.*

"That the words 'if able' be inserted between the words 'and' and 'to' in the 17th line of the 6th Section."—*Negatived.*

The Bill was then read a second time by the Deputy Secretary and passed.

Mr. Scott asked the President whether the Government intended to bring in the Bill alluded to in the Proceedings of the Council of the 28th January 1862, with the view of securing, if possible, the important object of suppressing the production in the market of Cotton in an unclean state, and checking the practice of packing Cotton falsely.

The President said that Government having made inquiries into the subject of Cotton frauds, found that Act III. of 1829 had for the last ten years, when strictly enforced, been found efficient not only to punish all frauds committed at Surat and Broach, but to deter men from attempting to commit them. It therefore appeared unnecessary to legislate further on the subject. But Government directed the Police Commissioners to take care that the Act was enforced in all cases that came before their subordinates, and the respectable dealers had every assistance from them in bringing offenders to justice.

It is not the intention of Government to introduce any new Legislative measure on the subject, as the Merchants have the remedy in their own hands; for if they will only unite to bring the offenders forward, Government will take care that the law is enforced.

The President then addressed the Council in the following words:—

"I am now directed by His Excellency the Governor to close this the first Session of his Council for making Laws and Regulations.

"Eight Bills have been laid before you for consideration. Of these, seven have been passed, and one for altering the jurisdiction of the subordinate Civil Courts has been withdrawn for further consideration, which it will receive before being again introduced.

"Of the Bills which have been passed, three are on subjects of much importance. The Bill for extending the powers of Municipal Commissioners, by allowing them to assign a certain portion of their Funds to Local Dispensaries and Schools will extend their means of doing good. But its working must be closely watched by the Government in order to prevent any abuse of the discretion now permitted.

"The Bills for the preservation of the Bhagdaree tenure and the restoration of the Talookdars, though of application only in a small portion of the territory subject to Bombay, will, it is hoped, have the effect of re-establishing in Gujarat a body of men holding their property on a tenure more independent of Government than that on which the Ryots generally hold.

"The duties of the Council having been new to all of us, we have of course experienced their minor difficulties, which henceforth will disappear. However, I hope we have worked satisfactorily and in the cause of good order.

"His Excellency the Governor desired to alter the Rules under which we first met, so as to adapt them to what we find our proceedings require, and the time therefore which we have spent this Session in preparing those Rules for his approval, will, I hope, next Session be spared for Laws of more general application, should any such be called for.

"In conclusion, his Excellency the Governor desires me to express to you his satisfaction and approval of your proceedings, and his thanks for your attention to your duties, the fruits of which he trusts will be secured for future generations.

"The Session is adjourned to Tuesday the 15th July 1862."

*By order of His Excellency the Governor of Bombay in Council,*

LYTTELTON H. BAYLEY,

Deputy Secretary to Government.

*Bombay Castle,* 26*th March* 1862.

# मुंबई येथील लेजिस्लेटिव डिपार्टमेंटाचें प्रोसिडिंग.

**कायदे व कानू करण्यासाठीं बंदेगान आलीनवाब मुस्तताब हजरत आनरबल् गवरनर साहेब बाहादूर जंजिरे मुंबई यांचें कौन्सिल भरलें होतें त्या वेळीं काम चाललें त्यांतील खालीं लिहिलेला उतारा सर्वांस जाहीर होण्यासाठीं प्रसिध्ध केला आहे.**

तारीख २६ वी माहे मार्च सन १८६२.

कायदे व कानू करण्यासाठीं मुंबईचे गवरनर साहेबांचे कौन्सिलाची सभा आजच्या दिवसापर्यंत तहकूब केली होती त्याप्रमाणे आज पुनः भरली.

हजर.

आनरबल् फ्रीयर साहेब.
आनरबल् इनवेरारिटी साहेब
आनरबल् वेस्ट्राप साहेब.
आनरबल् ट्रिस्ट्राम साहेब.
आनरबल् रस्तमजी जमसेटजी जीजीभाई साहेब.
आनरबल् जगन्नाथ शंकरशेट साहेब.
आनरबल् शेट प्रेमाभाई हेमाभाई.
आनरबल् स्काट साहेब
आनरबल् राबर्टसन साहेब.
आणि डेपुटी सेक्रेटारी साहेब.

कौन्सिलाचे आर्डिनरी मेंबरांपैकीं आनरबल् फ्रीयर साहेब मात्र हजर होते सबब ते, गवरनर साहेब आले नव्हते म्हणून प्रेसिडेंट झाले.

प्रेसिडेंट साहेब म्हणाले कीं अमदाबाद जिल्ह्यांतील गिराशिये लोकांची स्थिति पूर्ववत् प्रमाणें करण्याविषयींचे व त्यांस कर्जांतून मुक्त करण्याविषयींचे आक्टाचे मसुद्याबाबद सिलेक्ट कमिटीनें केलेले रिपोर्टाचा विच्यार करण्याचें मागल्या सभेंत तहकूब केलें होतें त्या रिपोर्टाचा प्रथम विच्यार करणें आहे.

मग आनरबल् वेस्ट्राप साहेब म्हणाले कीं कमिटीनें मसुदा फार वाढविला आहे खरा परंतु त्यांतील मतलब आनरबल् रीवझ साहेबानी प्रथम मसुदा केला होता त्या सारिखाच आहे आणि १ ले कलमांत सुमारें वार्षिक नफा लिहिला आहे त्याची स्पष्ट व्याख्या करून लिहिणें योग्य आहे असें आह्मास वाटतें.

यावर आनरबल् राबर्टसन साहेब म्हणाले कीं शेंकडा ७० टके सरकार घेतें व शेंकडा ३० टके मात्र तालुकदारास राहातें.

आनरबल् वेस्ट्राप साहेब म्हणाले कीं १ ले कलमांत खालीं लिहिल्या प्रमाणें फेरफार करावे.

"वार्षिक नफा" हे शब्द ९ वे ओळींत आहेत ते काढून टाकावे आणि त्यांबद्दल "भाडीं व नफे व इतर वार्षिक उत्पन्न" हे शब्द घालावे; आणि ११ वे ओळींत "जमिनींचा कर व सरकारचीं इतर देणीं हीं त्यांतून बाद केल्यानंतर" हे शब्द "वर्षे" या शब्दानंतर घालावे.

ही गोष्ट सर्वांमतें कबूल झाली.

आनरबल् सेट प्रेमाभाई हेमाभाई ह्मणाले कीं ८ वे ओळींत "पांच" या शब्दाबद्दल "दाहा" हा शब्द घालावा.

हा फेरफार करण्याविषयीं ३ अनुमतें पडलीं व न करण्याविषयीं ६ पडलीं ह्मणून नाकबूल झाला.

नंतर आनरबल् वेस्ट्राप साहेब म्हणाले कीं २ रे व ३ रे व ५ वे कलमाचे पहिले ओळींत "करणें" या शब्दाबद्दल "प्रसिध्ध करणे" हा शब्द घालावा.

ही गोष्ट सर्वांमतें कबूल झाली.

नंतर आनरबल् सेट प्रेमाभाई हेमाभाई याणीं विच्यारलें कीं ३ रे कलमांतील ७ वे ओळींत "जमिनी" हा शब्द आहे त्यांत "वांटा" या शब्दाचा समावेश होतो किंवा नाहीं.

आनरबल् वेस्ट्राप साहेब म्हणाले कीं निःसंशय होतो.

मग आनरबल् वेस्ट्राप साहेब ह्मणाले कीं ३ रे कलमाचे ७ वे ओळींतील "तालुकदार" या शब्दापुढें "कोणतेही प्रकारचा" हे शब्द घालावे.

ही गोष्ट सर्वांमतें कबूल झाली.

नंतर आनरबल् वेस्ट्राप साहेब ह्मणाले कीं ३ रे कलमाचे ८ वे ओळींतील "गाहाण देणारा" या शब्दाबद्दल "गाहाण घेणारा" हा शब्द घालावा; आणि त्याच ओळींत "अथवा" या शब्दानंतर "इतर" हा शब्द घालावा.

ही गोष्ट सर्वांमतें कबूल झाली.

आनरबल् वेस्ट्राप साहेब म्हणाले कीं ४ थे कलमाचे ५ वे व ६ वे ओळींतील "धरणें" या शब्दापुढें खालीं लिहिलेले शब्द घालावे ह्मणजे "अथवा कोणतेही प्रकारची त्याची जंगम मालमत्ता जप्त होण्यास किंवा विकली जाण्यास पात्र नाहीं" हे शब्द घालावे.

ही गोष्ट सर्वांमतें कबूल झाली.

आनरबल् वेस्ट्राप साहेब म्हणाले कीं ६ वे ओळींत "प्रोसेस" आणि "आफ" या शब्दांचे दरमियांन "हुकूमनामा किंवा निवाडा किंवा वज्यावण्याचा हुकूम" हे शब्द घालावे.

ही गोष्ट सर्वांमतें कबूल झाली.

आनरबल् वेस्ट्राप साहेब म्हणाले कीं ७ वे कलमांतील १८ वे ओळींत "करणे" या शब्दाबद्दल "प्रसिध्ध करणे" हा शब्द घालावा.

ही गोष्ट सर्वांमतें कबूल झाली.

आनरबल् सेट प्रेमाभाई हेमाभाई म्हणाले कीं ८ वे कलमाचे ११ वे ओळींत "तीन" या शब्दाबद्दल "साहा" हा शब्द घालावा.

तीन महिन्यांची मुदत पुरी आहे असें कमिटीचें म्हणणें आहे म्हणून सदर्हू प्रमाणें फेरफार करूं नये असें आनरबल् वेस्ट्राप साहेब म्हणाले.

आनरबल् जगन्नाथ शंकरशेट साहेब म्हणाले कीं कोणी मनुष्य एकादे वेळेस गांवीं नसतो किंवा यात्रेस गेला असतो यासाठीं साहा महिने असावे.

यावर आनरबल् राबर्टसन साहेब म्हणाले कीं याबाबद ९ वे कलमांत ठराव केला आहे. आणि ६ महिने केल्याने अमलदारांचें काम फार लांबेल.

तेव्हां आपली हरकत नाहीं म्हणून आनरबल् जगन्नाथ शंकरशेट साहेब म्हणाले.

सदर्हू प्रमाणे फेरफार करण्याविषयीं अनुमतें घेतलीं तेव्हां न करण्याविषयीं ८ अनुमतें पडलीं व करण्याविषयीं १ पडलें म्हणून फेरफार करण्याचें नाकबूल झालें.

आनरबल् वेस्ट्राप साहेब म्हणाले कीं १० वे कलमांतील ५ वे व ६ वे ओळींतील "तालुकदारी इस्टेटावरील ओरवीम दूर करणें" हे शब्द काढून टाकावे व त्यांबद्दल "तालुकदाराचे कर्जाचा व देण्याचे पेंचांचा निकाल करणे" हे शब्द घालावे.

ही गोष्ट सर्वांमतें कबूल झाली.

आनरबल् सेट प्रेमाभाई हेमाभाई म्हणाले कीं त्याच कलमांतील ११ वे ओळींत "वाढविण्यांत येणार नाहीं" या शब्दांपुढें "किंवा कमी करण्यांत येणार नाहीं" हे शब्द वाढवावे.

हा फेरफार करण्याविषयीं अनुमतें घेतलीं तेव्हां करण्याविषयीं १ अनुमत पडलें व न करण्याविषयीं ८ अनुमतें पडलीं म्हणून ती गोष्ट नाकबूल झाली

आनरबल् वेस्ट्राप साहेब म्हणाले कीं ज्या अंमलदारानी (पिल साहेबानी) या प्रकरणीं उत्कृष्ट रिपोर्ट केला आहे त्यांच्या सांगण्यावरून ११ वें कलम दाखल केलें होतें आणि हें कलम ठेवण्याविषयीं आमचेंही अनुमत आहे तथापि तें खालीं लिहिल्यां प्रमाणे बदलून ११ वे कलमाबद्दल दाखल करावें.

११ तालुकदाराचे कर्जाचा व देण्याचे पेंचाचा निकाल करण्याकरितां पैका जमविण्यासाठीं खालीं लिहिल्या प्रमाणें करण्याचा अधिकार सदर्हू प्रकारचे अंमलदारास किंवा अंमलदारांस देण्यास गवरनर इन् कौन्सिल मुखत्यार आहेत, म्हणजे तालुकदाराचे कोणतेही प्रकारचे इस्टेटाचे तारणावर कोणी लायक मनुष्य किंवा मनुष्यें पैका धीरतील त्यांस सदर्हू प्रकारचा जाहीरनामा प्रसिद्ध झाल्याचे तारिखेपासून पराकाष्ठा २० वर्षांपर्यंतचे कोणतेही मुदतीपर्यंत किंवा मुदतींपर्यंत तें सर्व इस्टेट किंवा त्याचा कोणताही भाग भोगवट्यास देऊन अथवा त्या इस्टेटांतील जो भाग किंवा जे भाग दुसरे ठिकाणीं असतील ते विकून पैका जमविण्याचा अधिकार सदर्हू प्रकारचे अमलदारास किंवा अंमलदारांस देण्यास गवरनर इन् कौन्सिल मुखत्यार आहेत; परंतु सदर्हू प्रमाणे विकणें तें तालुकदाराचें किंवा त्याचा वारीसदार

वयांत आलेला असल्यास त्याचें अनुमत प्रथम घेतल्या वांचून विकूं नये.

ही गोष्ट सर्वांमतें कबूल झाली.

नंतर १२ वें व १३ वें व १४ वें व १५ वें व १६ वें व १७ वें कलम सर्वांमतें कबूल झालें.

आनरबल वेस्त्राप साहेब ह्मणाले कीं १८ वे कलमांतील "सन १८३९चे २ रे आक्टाचे १८ वे कलमावरून माजिस्ट्रेट" हे शब्द काढून टाकून त्यांबद्दल "सन १८६१चे २५ वे आक्टाचे ६१ वे कलमावरून कोर्टें" हे शब्द घालावे.

ही गोष्ट सर्वांमतें कबूल झाली.

१९ वें व २० वें व २१ वें कलम सर्वमतें कबूल झालें.

आनरबल वेस्त्राप साहेब ह्मणाले कीं ७ वे कलमाचे ६ वे ओळींत "शाळ" या शब्दापुढें खालीं लिहिलेले शब्द घालावे ह्मणजे "जमिनीचा कर व इतर कर्जें किंवा देणीं सरकारास द्यावयाचीं झालीं असतील किंवा पुढें देणें होतील तीं त्यांतून अदा करावीं आणि" हे शब्द घालावे.

ही गोष्ट सर्वांमतें कबूल झाली.

प्रेसिडेंट साहेब म्हणाले कीं २९ वे नियमान्वयें मसुदा दुसरे वेळीं वाचण्याविषयीं दरखास्त करतां येत नाहीं.

यावर आनरबल वेस्त्राप साहेब म्हणाले कीं या मसुद्या बाबद पूर्तेपणीं वाद विवाद झाला असून तो सर्वांनी कबूल केला आहे यास्तव प्रेसिडेंट साहेबानी २९ वा नियम तहकूब केला पाहिजे.

मग प्रेसिडेंट साहेबानी २९ वा नियम तहकूब केला.

तेव्हां आनरबल ट्रिस्ट्राम साहेब म्हणाले कीं मसूदा सुधारला आहे तसा दुसरे वेळीं वाचावा.

मसुदा सुधारला होता तसा डेप्युटी सेक्रेटारी साहेबानी दुसरे वेळीं वाचला व तो कायम झाला.

नंतर प्रेसिडेंट साहेब म्हणाले कीं अल्पवयीअपराध्यांचे सन्मार्ग प्रवर्तक शाळा विषयींचे आक्टाचे मसुद्या बाबद सिलेक्ट कमिटीने केलेले रिपोर्टाचा आतां विचार करणे आहे.

खालीं लिहिलेले फेरफार करण्याविषयीं मागल्या सभेंत प्रेसिडेंट साहेबानी सुचविलें होतें ते फेरफार करावे असें ते म्हणाले.

मसुद्याचे १ ले कलमाचे ४ थे व ५ वे ओळींत "सदई प्रकारची शाळा" या शब्दा बद्दल खालीं लिहिलेले शब्द दाखल करावे.

"ज्या शाळेंत उद्योग शिकविण्याची योजना असेल आणि मुलांकडून विद्याभ्यास करवित असतील व अन्न वस्त्र देत असतील व त्यांस राहाण्याची सोई करून दिली असेल ती शाळा."

ही गोष्ट सर्वा मतें कबूल झाली.

मसुद्याचे ३ रे कलमाचे २६ वे ओळींत "तें" या शब्दा बद्दल "तो" हा शब्द घालावा.

ही गोष्ट सर्वा मतें कबूल झाली.

मसुद्याचे ६ वे कलमाचे ६ वे ओळींतील "पात्र होईल" हे शब्द काढून टाकावे व खालीं लिहिलेलें कलम ११ कलम म्हणून घालावें.

११ मुलाच्या गुजारा चालविण्यास जो मनुष्य कायद्यान्वयें पात्र असेल त्या मनुष्याचा समावेश या आक्टांतील आई किंवा बाप या शब्दांत होतो असें समजावें.

ही गोष्ट सर्वा मतें कबूल झाली.

आनरेबल शेट प्रेमाभाई हेमाभाई म्हणाले कीं आमच्या मतें मसुद्यांतील ठराव फार सक्त आहेत म्हणून खालीं लिहिल्या प्रमाणे फेरफार करावे.

३ रे कलमाचे ११ वे ओळींत "इरेक्ट" व "सच" या शब्दांचे दरमियान खालीं लिहिलेले शब्द घालावे.

"सदर्हू प्रकारचे कोर्टास किंवा जज्यास किंवा पोलीस माजिस्ट्रेटास योग्य वाटेल तर.

ही गोष्ट सर्वा मतें कबूल झाली.

३ रे कलमाचे १६ वे ओळींत "दोन" या शब्दा बद्दल "एक" हा शब्द घालावा आणि त्याच कलमाचे १७ वे ओळींत "पांच" या शब्दा बद्दल "च्यार" हा शब्द दाखल करावा.

ही गोष्ट सर्वा मतें नाकबूल झाली.

४ थे कलमाचे १५ वे ओळींत "तीन वर्षें" या शब्दां बद्दल "साहा महिने" हे शब्द दाखल करावे.

ही गोष्ट सर्वा मतें नाकबूल झाली.

६ वे कलमाचे १७ वे ओळींत "आंड" व "टू" या शब्दांचे दरमियान करवेल तर" हे शब्द घालावे.

ही गोष्ट सर्वा मतें नाकबूल झाली.

नंतर मसुदा डेप्यूटी सेक्रटारी साहेबानी दुसरे वेळीं वाचला व तो कायम झाला.

आनरेबल स्काट साहेबानी प्रेसिडेंट साहेबांस विच्यारलें कीं साफ नाहीं असा कापूस विकण्यास आणण्याची चाल मोडण्याचा व चांगले जातीचा व वाईट जातीचा कापूस मेळून गठ्ठे बांधण्याची चाल बंद करण्याचा मोठा हेतू साधेल तितका साधण्याचे इराद्याने सन १८६२ चे जानुअरी महिन्याचे २८ वे तारिखेचे कोन्सिलाचे प्रोसिडिंगांत ज्या मसुद्या विषयीं लिहिले आहे तो मसुदा कोन्सिलांत गुजारण्याचा सरकारचा इरादा आहे किंवा नाहीं.

प्रेसिडेंट साहेब म्हणाले कीं कायद्याचे दग्या प्रकरणीं चौकशी केल्यावरून सरकारास असें जाहीर झालें आहे कीं सन १८२९ चा ३ रा आक्ट सक्त रीतीनें अंमलांत आणल्यावरून सुरत व भडोच येथील दगे करणारे लोकांस शिक्षा करण्यास व दग्याची मनाई करण्यास त्या आक्टांतील ठराव पूर्ते आहेत असें मागील दहा वर्षांत कळून आलें आहे. यास्तव त्या बाबत आणखी कायदा करणें जरूर नाहीं. परंतु सरकारानी पोलीस कमिशनरांस असा हुकूम केला आहे कीं त्यांचे ताब्यांतील अंमलदारापुढें या प्रकरणीं मुकदमे येतील त्यांस त्याणी तो आक्ट लागू करावा आणि गुन्हेगारांची चौकशी होण्याविषयीं आब्रूदार व्यापाऱ्यास सर्व प्रकारें मदत करावी या बाबद नवीन कायदा करण्याचा सरकारचा इरादा नाहीं. कारण व्यापारी लोकांचे हातीं इलाज आहे ते जर एकत्र होऊन गुन्हेगारावर रुजू करतील तर सरकार त्या बाबद कायदा अमलांत आणील.

नंतर प्रेसिडेंट साहेबानी खालीं लिहिल्या प्रमाणे संभाषण केलें:–

कायदे व कानू करण्याविषयींचें आपले कौन्सिलाचें हें पहिलें सेशन बंद करण्याविषयीं आलीज्या गवरनर साहेबानी आह्मास फरमाविलें आहे.

विच्यार करण्या साठीं ८ आक्टाचे मसुदे कौन्सिलांत गुजारले होते त्यांतून सात कायम झाले व एक दिवानी कोर्टाचे हुकुमतींत फेरफार करण्याविषयीं होता त्याचा आणखी विच्यार करण्यासाठीं तो परत घेतला. तो पुन्हा गुजारण्या पूर्वीं त्याचा विच्यार करण्यांत येईल.

जे मसुदे कायम केले त्यांतून तीन मोठे अगत्याचे आहेत: म्युनिसिपलफंडांतून कांहीं ऐवज गांवांतील दवाखान्यांस व शाळांस देण्याविषयीं मसुदा ठरला आहे त्यावरून म्युनिसीपल कमिशनरांस लोकांचें चांगलें करण्याविषयीं ज्यास्ती अधिकार प्राप्त झाला आहे परंतु या अधिकाराचा गैर उपयोग न व्हावा ह्मणून हा आक्ट कसा काय अमलांत येतो याविषयीं सरकारास बारीक तजवीज ठेवली पाहिजे.

भागदारी वहिवाट कायम ठेवण्याविषयीं व तालुकदारांची स्थिति पूर्ववत् करण्याविषयींचे आक्टाचे मसुदे मुंबई प्रेसिडेन्सीचे ताब्यांतील मुलकाचे लाहानसे भागास लागू आहेत खरे परंतु रैयत लोकांकडे सरकारांतून जमिनी बहुतकरून चालतात त्यांहून अधिक सुखत्यारीनें चालण्याच्या जमिनी ज्या लोकांकडे आहेत असे कांहीं लोकांची गुजराथ प्रांतांत पुन्हा संस्थापना सदरहू मसुद्यावरून होईल.

कौन्सिलाचें हें काम आपणास सर्वांसच नवीन असल्यामुळें लाहानलाहान अडचणी आल्या खऱ्या परंतु त्यापुढें नाहींशा होतील. आपण काम केलें तें पसंद पडून लोकांचें त्यापासून कल्याण होईल अशी आह्मी उमेद ठेवतों.

ज्या नियमां प्रमाणे आपली प्रथम सभा झाली ते आपले कामासाठीं जसे असावे तसे फिरण्याविषयीं आलीज्या गवरनर साहेबानी सांगितलें होतें आणि त्यांचे मंजुरी साठीं ते नियम तयार करण्यांत आपला या सेशनांत वेळ गेला तसा पुढल्या सेशनांत वेळ जाणार नाहीं व सर्व ठिकाणीं लागू असे नियम करावयाचे असल्यास ते करण्यासाठीं अधिक वेळ सांपडेल. असी आह्मी उमेद ठेवतों.

आपण चालविलेलें काम आलीज्या गवरनर साहेबांस पसंद येऊन त्याणी मंजूर केलें आहे आणि आपण आपले कामाकडे लक्ष दिलें त्यासाठीं सुकुर गुझारी करण्याविषयीं त्याणी आह्मास सांगितलें आहे. या कामाचें फळ लोकांस पुढें प्राप्त होईल असी साहेब मवसूफ उमेद ठेवीत आहेत.

येत्या जुलै महिन्याची तारिख १५ मंगळवार पर्यंत सेशन तहकूब असे.—

बमुजिबे हुकूम ग्रंदेगान आली नकाब मुस्तताब हजरत आनरबल् गवरनर साहेब बाहादूर दरइजलास कोन्सिल.

लिटल टन् हाली ओक बेली साहेब,

डेपुटी सक्रेटारी निसबत सरकार यांची सही.

मुकाम अंजिरे मुंबई,

तारिख २६ माहे मार्च सन १८६२.

(True translation)
VENAYEK WASSOODEW,
Oriental Translator to Government.